"Dissemination of Education for Knowledge, Science and Culture."
- Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe

SHRI SWAMI VIVEKANAND SHIKSHAN SANSTHA'S

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (EMPOWERED AUTONOMOUS)

2130, 'E' Ward, Tarabai Park,
Tal. Karveer, Dist. Kolhapur - 416 003.
Affiliated to Shivaji University, Kolhapur (M.S.)

NAAC Reaccredited : "A" (CGPA - 3.24 in 3rd Cycle)
College with Potential Excellence by U.G.C., New Delhi
"Star College" by D.B.T. Govt. of India
ISO 9001 : 2015

**2024-25**

## *Report : BOOK REVIEW*

1. **Name of Department** : **Department Of Marathi**
2. **Name of Organized Activity** : Book Review
3. **Date/ Duration** : 22/02/2025
4. **Aims and Objectives** : 1. To Provide activity for Writing skill among the students.
   2. Students got to know about verious type book in Marathi leterature
5. **No. of beneficiaries** : **Total = 08**

| | | |
|---|---|---|
| Teacher | Male | 02 |
| | Female | 01 |
| Students | Male | 03 |
| | Female | 02 |
| Total | | 08 |

6. **Expenditure & funding agency** : NIL
7. **Brief description** : In order to give a activity to the writing skill and style of the students of B.A. I, II, III And B.Com.I of Marathi Department, book review activity to create a Marathi writing skill and also various books knows about the student. To devlop the creative mind and writing ideas.
8. **Outcomes** : 1. The Writing Skill And style of the students got a Activity.
   2. Students were verious book to read and write a book review.
9. **Photos** : Enclosed
10. **Signatures of coordinator/ organizer**: Prof. Dr. Ekanath Alwekar

HEAD
DEPARTMENT OF MARATHI
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(EMPOWERED AUTONOMOUS)

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार'

- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित

**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था )**

# मराठी विभाग

**सन २०२४-२५**

## पुस्तक परीक्षण

**सूचना**

---

दि. ०५/०१/२०२५

बी. ए. भाग १,२,३ आणि बी.कॉम.भाग १ मराठी विषयाच्या सर्व विद्यार्थी- विद्यार्थीनींना सूचित करण्यात येते की, वर्षभरात वाचलेल्या मराठी पुस्तकाचे पुस्तक परीक्षण गुरुवार, दि.२२ फेब्रुवारी २०२५ पर्यंत मराठी विभागामध्ये जमा करावे.

प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर

विभाग प्रमुख
मराठी विभाग,
विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Empowered Autonomous)

'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार'

- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित

**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था )**

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

# मराठी विभाग

सन २०२४-२५

## पुस्तक परीक्षण केलेल्या विद्यार्थ्यांची यादी

| अ.क्र. | रोल नं | विद्यार्थ्यांचे नाव | सही |
|---|---|---|---|
| १. | 4205 | श्रावणी नंदकुमार पाटील | Snpatil |
| २. | 4022 | प्रथमेश महादेव चव्हाण | Chavan |
| ३. | 4070 | तेजस शिवाजी जामदार | [illegible] |
| ४. | | ओम अतुल खटावकर | [illegible] |
| ५. | 4002 | अनुष्का परशराम आडसुळे | Adsule |
| ६. | | ओम अतुल खटावकर | [illegible] |
| ७. | | | |
| ८. | | | |
| ९. | | | |
| १०. | | | |
| ११. | | | |
| १२. | | | |
| १३. | | | |
| १४. | | | |
| १५. | | | |

प्रा.डॉ.एकनाथ आळवेकर

विभाग प्रमुख
मराठी विभाग,
विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

2024-25 ⑤ नाव: ओम अतुल खटावकर
B. Com-I
9325568384
(30)
20/1/25

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

# धर्मयोध्दा कल्की - विष्णूचा अवतार.
## (पुस्तक परिक्षण)
मूळलेखक: श्री. केविन मिस्सल (इंग्रजी)
मराठी अनुवाद: श्री. प्रमोद शेजवलकर.

आज 'धर्मयोध्दा कल्की - विष्णूचा अवतार' या मूळलेखक श्री. केविन मिस्सल यांनी इंग्रजीमध्ये लिहिलेल्या आणि श्री. प्रमोद शेजवलकर यांनी मराठीमध्ये अनुवादीत केलेल्या या पुस्तकाचे परिक्षण वाचताना आपणा वाचकांच्या लक्षात आले असेलच की या पुस्तकाचे कथानक पौराणिक साहित्यप्रकारावर आहे. आणि 'कल्की' अवतारासाठी समर्पित आहे. आणि हे पुस्तक मला व्यक्तिशः खूप आवडले आहे.

सदर पुस्तक लिहिण्यासाठी लेखकाने अनेक पौराणिक कथा आणि पात्रांचा आधार घेऊन त्यांचा कथानकामध्ये आपल्या ओघवती भाषाशैलीद्वारे सुरेख वापर केला आहे. या कथानकातील बऱ्याचशा पात्रांपैकी अनेकांची आपल्याशी इतर पौराणिक कथा साहित्यामधून ओळख आहे. तर काही पात्रे पूर्णपणे नवखी व अपरिचित आहेत

हे कथानक, त्यातील पात्रे आणि प्रसंगांबद्दल बोलण्याआधी हे पुस्तक माझ्या वाचनात कसे आले ? हे थोडे सांगतो..... हे पुस्तक जानेवारी 2018 साली प्रकाशित झाले होते. मला वाचनाची आवड आहे. पण कामाच्या व्यापातून वेळ मिळाला तर वाचन करायचे या सदरात मोडणारा मी 'हौशी वाचक'. त्यामुळे नवीन किंवा लोकप्रिय लेखकांची पुस्तके कधी प्रकाशित होणार आहेत ? कधी प्रकाशित झाली ? कोणती Bestseller झाली ? याबद्दल मला माहिती असण्याइतका devoted reader मी नव्हतो. त्यामुळे या पुस्तकाबद्दल मला माहीती असण्याचा काहीही संबंध नव्हता. पण साधारणपणे जून 2018 च्या दरम्यान मी काही कारणाने प्रवास करत असताना माझा एक सहप्रवासी हे पुस्तक वाचत होता. आणि त्याआधी या ना त्या कारणाने 'कल्की हा विष्णूचा दहावा अवतार होणार आहे आणि कलियुगात सुरु असलेल्या पाप, अधर्म, अनाचाराचा सुरु असलेल्या अमंगळाचा विनाश करुन पुन्हा 'धर्मसंस्थापना' करण्यासाठी विष्णू कल्की अवतार घेणार' या आशयाचे बरेचसे ऐकण्यात, वाचनात आले होते. त्यामुळेच या

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Empowered Autonomous)



या विषयातील माझी स्वाभाविक जिज्ञासा आणि उत्सुकतेपोटी मी त्या सहप्रवाशाकडे या पुस्तकाबद्दल विचारणा केली. त्यानेदेखील हे एक सुंदर, वेगवान आणि मनाची पकड घेणारे कथानक असल्याचे सांगितले. खरेतर त्या प्रवासामध्ये आमच्याकडे खूप मर्यादित वेळ असूनसुद्धा त्याने खूप आत्मीयतेने चर्चा केली व हे पुस्तक एकदा वाचण्याबद्दल आवर्जून शिफारस केली.

या चर्चेतून प्रभावित होऊन मीदेखील प्रवास संपल्यानंतर लेखक श्री. केविन मिस्सल यांच्याबद्दल माहिती घेतली. त्यानुसार श्री. केविन मिस्सल हे दिल्लीस्थित, एक २१ वर्षीय तरुण तसेच एक प्रतिभावंत, लोकप्रिय लेखक आहेत. ते सेंट स्टीफन कॉलेजचे पदवीधर आहेत. त्यांच्या या 'कल्की' कथामालिकेव्यतिरिक्त 'यम', 'महावतार नरसिंह', 'रावणपुत्र मेघनाद', 'अंगराज कर्ण' अशा लोकप्रिय साहित्यकृती प्रकाशित झालेल्या आहेत. ते एक 'Bestseller' लेखक आहेत. कल्की या कथामालिकेत 'धर्मयोद्धा कल्की - विष्णूचा अवतार' हा कथानकाचा पहिला भाग असून भाग २ 'सत्ययोद्धा कल्की - ब्रह्माचा डोळा' आणि भाग ३ 'महायोद्धा कल्की - शंकराची तलवार' या नावाने प्रकाशित झालेला आहे. आणि या पुस्तकांचे मराठी अनुवाददेखील बाजारात उपलब्ध आहेत. मग काय.... दुधात साखरच म्हणायची.

मी हे अनुवादीत पुस्तक लगेचच खरेदी केले पण कामाच्या व्यस्ततेमुळे बराच काळ हे पुस्तक फक्त माझ्या पुस्तकांच्या कपाटाची शोभा वाढवत पडून होते. पण मार्च २०२० च्या दरम्यान 'कोरोना'ची भयंकर जागतिक महामारी आली. सगळे जगच एका जागेवर ठप्प झाले. कडक Lockdown जाहीर झाला. कुणी कुठून यायचे नाही.... आणि कुणी कोठेही जायचे नाही.... घरातल्या घरात तुरुंगवासच होता जणू. त्यामुळे रिकामा वेळ मुबलक प्रमाणात उपलब्ध होता. आणि नेमक्या त्यावेळी मला या पुस्तकाची आठवण झाली.....!

या कल्की अवताराच्या कथामालिकेतील पहिल्याच पुस्तकाचे शीर्षक लेखकाने अतिशय समर्पकपणे निवडले आहे. या शीर्षकातील 'धर्मयोद्धा' हा शब्दच वाचकांना संपूर्ण कथानकाचा संदर्भ सांगून जातो.

भगवान श्रीकृष्णांनी युद्धभूमीवर प्रत्यक्ष युद्ध सुरू होण्या-

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Empowered Autonomous)


आधी अक्षरश: कालचक्र थांबवून अर्जुनाला हे युद्ध करणे अत्यावश्यक का आहे? हे समजून सांगताना जो उपदेश केला तोच आज 'भगवद्गीता' या महाकाव्याच्या रूपाने अजरामर झाला आहे. या उपदेशातील अध्याय क्र. ४ मधील ७व्या श्लोकामध्ये या महायुद्धाचे आणि विष्णूने या भूतलावर विविध अवतार घेण्यामागचे प्रयोजन सांगितले आहे.

~~अभ्युत्थानम अधर्मस्य~~

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर् भवती भारत
अभ्युत्थानम् अधर्मस्य तदात्मानं सृजाम्य अहम्
परित्राणाय साधूं विनाशायच: दुष्कृतं
धर्मसंस्थापनार्थाय संभवामी युगे युगे

या श्लोकाचा थोडक्यात अर्थ असा की, 'हे अर्जुना, ज्या ज्या वेळी धर्माचे अध:पतन होऊन धर्मक्षय होईल आणि अन्याय, अधर्म, अनाचाराचा कहर होईल, त्या त्या वेळी मी धर्मसंस्थापनेसाठी मी अवतार घेऊन या अधर्माचा विनाश करेन.'

कल्की हा विष्णूचाच दहावा अवतार असल्यामुळे आणि तो अधर्माचा नाश करून पुन्हा धर्माची स्थापना करण्यासाठीच आहे हे सांगण्यासाठी 'धर्मयोद्धा कल्की' हे शीर्षक लेखकाने सार्थपणे निवडले आहे.

पुस्तक हातात घेतल्यावर पुस्तकाचे मुखपृष्ठ मनोवेध घेते. हे मुखपृष्ठाचे आणि मलपृष्ठाची रचना / आरेखन 'आर्थर स्टुडिओ' या व्यावसायिक संस्थेने आकर्षकपणे केली आहे. ~~ह~~ मुखपृष्ठावर अधर्माच्या दाटलेल्या काळ्याकुट्ट ढगांच्या आणि क्षितिजावर नव्याने उगवू पहाणाऱ्या धर्माच्या संधीप्रकाशाच्या पार्श्वभूमीवर बलदंड कथानायक कल्की हातात तलवार, खांद्यावर धनुष्य आणि पाठीवर बाणांचा भाता धारण करून एका असुरावर (अधर्माच्या प्रतिकावर) त्वेषाने चालून जात असल्याचे दाखविले आहे. तर मलपृष्ठावर धर्माच्या संधीप्रकाशात न्हाऊन निघालेले हिमालयातील पर्वतराजीमधील एक शिखर चित्रित केलेले आहे. बहुदा हे पर्वतशिखर आणि परिसर म्हणजे या पुस्तकात वर्णन केलेले कल्कीचे गांव 'शांबला'चे प्रतिरूप दाखविणे रचनाकर्त्याला अभिप्रेत असावे.

कल्की अवतारासाठी समर्पित तीन पुस्तकांची कथामालिका

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

'प्रकाश बुक्स इंडिया प्रा. लि.' या प्रकाशन संस्थेच्या 'Fingerprint MARATHI' या मराठी भाषांतर विभागाने 25 जानेवारी, 2018 रोजी प्रकाशित केली. या कथामालिकेव्यतिरिक्त या प्रकाशन संस्थेची हिंदी, इंग्रजी, मराठी, तमिळ अशा विविध प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध असणारी आणि विविध विषयांवर आधारीत असणारी अनेक लोक-प्रिय पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत.

आता आपण 'धर्मयोद्धा कल्की - विष्णूचा अवतार' या पुस्तकातील, कथानक, प्रसंग आणि संदर्भांबद्दल बोलुया. पुस्तकाच्या अगदी पहिल्याच प्रकरणापासून बऱ्याच वेळा आणि बऱ्याच ठिकाणी आपल्याला जाणवते की हे लेखन 'रामायण', 'महाभारत', 'विष्णु पुराण', 'कल्की पुराण', 'श्रीमद्भगवद्गीता,' इ. पौराणिक ग्रंथसाहीत्य तसेच अगदी अलिकडेच प्रदर्शित झालेला दाक्षिणात्य चित्रपट 'बाहुबली'; इंग्रजी चित्रपट 'गेम ऑफ थ्रॉन्स' या चित्रपटातील काही प्रसंगांवरुन प्रभावित आहे.

अर्थातच 'रामायण', 'महाभारत', इ. पौराणिक विषय आहेत. म्हणजे ते हजारो वर्षांच्या मोठ्या कालावधीपूर्वी घडून गेलेले आहेत असे आपणांस म्हणता येईल. आणि याच विविध पौराणिक ग्रंथांनुसार 'विष्णूचा दहावा अवतार - कल्की हा कलीयुगाच्या (म्हणजे सध्या सुरु असलेल्या युगाच्या) शेवटच्या टप्प्यात कलीच्या अधिपत्याखाली सुरु झालेल्या अज्ञान, अधर्म, अनाचार या अमंगलाच्या विनाशासाठी जन्म (अवतार) घेईल असे भविष्यकथन आहे. म्हणजेच आजमितीला तरी हे कल्कीचे अवतार कथानक हे संपूर्णत: काल्पनिक आहे.

कथानकाच्या अगदी पहिल्याच प्रकरणामध्ये एका छोट्याशा लढाईचा प्रसंग शब्दबद्ध केलेला आहे. हा तथाकथित 'सम्राट कली' आणि एक तत्कालिन 'राजा वेदांत' यांच्यातील लढाईचा प्रसंग वाचताना 'बाहुबली' या चित्रपटातील एक प्रसंग अगदी हुबेहुबपणे आपल्या डोळ्यासमोर उभा रहातो. ज्यामध्ये कली असंख्य रानटी आणि अवाढव्य बैलांच्या शिंगांवर आगीने पेटलेले पलिते बांधून ही बेफाम आणि शिंगांवरील पेटलेल्या पलित्यांमुळे बुजलेली हजारो बैलांची झुंड राजा वेदांतच्या सुनियोजित व्यूहरचना केलेल्या शिस्तबद्ध सैन्यामध्ये सोडून देऊन या सैन्याची अक्षरश: दाणादाण

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

उडवून लढाईमध्ये अगदी सहज विजय मिळवतो. अगदी हाच प्रसंग आपल्याला 2015 साली प्रदर्शित झालेल्या 'बाहुबली'- 'The Beginning' या चित्रपटात पहायला मिळाला.

त्याचप्रमाणे, अगदी अलिकडेच प्रदर्शित झालेला आणखी एक दाक्षिणात्य चित्रपट 'KALKI - 2098 AD' हा चित्रपट तर या पुस्तकाचा आधार घेऊन चित्रित केलेला आहे असे म्हणणे धाडसाचे ठरणार नाही. या चित्रपटामध्ये, कलीच्या साम्राज्याचा पूर्णपणे उदय होण्याआधी कोणत्यातरी अगम्य आणि विचित्र आजाराने ग्रासलेला, डोक्यावरील केस झडलेला, फुफ्फुसांच्या अकार्यक्षमतेमुळे खोकून- खोकून अशक्त झालेला, निस्तेज व पांढरट पडलेली त्वचा ~~असणारा~~, निस्तेज व फिकट डोळे असणारा आणि या विचित्र आजारातून मुक्त होण्यासाठी एक विशिष्ठ द्रव्य / रसायन (serum) - पुस्तकामधील ~~याला~~ याला 'सोमरवड्यांपासून निघालेले द्रव्य' असे संबोधले आहे - ~~ते~~ प्राशन करणारा कमल हसन या दाक्षिणात्य लोकप्रिय अभिनेत्याने साकारलेला कली आणि कथानकातील वर्णनातील कली 'एकच' वाटतो. चित्रपटात चित्रित केलेले गांव, गावातील लोक, त्यांचे विविध दैनंदिन व्यवसाय, व्यवहार, बाजारपेठा आणि पुस्तकामध्ये वर्णन केलेले कथानायक कल्कीचे 'शंबला' गांव आणि राजा वेदांतचे राजधानीचे 'इंद्रगड' शहर यांच्या वर्णनात ~~थोडा~~ यत्किंचितही फरक जाणवत नाही.

असो. हे कथानक जरी काल्पनिक, कपोलकल्पित असले तरीही लेखकाने ते खूप वेगवान रितीने आणि ओघवती भाषेत मांडले आहे. कथानकाचा वेग कायम ठेवतानादेखील लेखकाची कथानकावरची पकड कोठेही ढिली झाली आहे असे वाटत नाही. त्यामुळे लेखकाच्या प्रतिभेचा आणि उत्तुंग कल्पनाशक्तीचा जागोजागी प्रत्यय येत रहातो. त्यामुळेच हे जवळपास ५३५ पानांचे जाडजूड पुस्तक 'पुढे काय होणार?' या उत्सुकतेपोटी हातातून बाजूला ठेवावे असे वाटतच नाही. पण जर वाचकाने आजपर्यंत वाचलेल्या, माहिती असलेल्या पौराणिक साहित्याचा संदर्भ लक्षात ठेऊन वाचले तर कथानक समजण्यासाठी खूपच मदत होते.

शंबलासारख्या शांत गावात कथानायक 'कल्की हरी'चा जन्म झाला. विष्णूयश हरी आणि सुमती यांचा पुत्र आहे. त्याचे बालपण

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
Empowered Autonomous

35

D D M M Y Y Y Y

एखादया सामान्य खेडेगावातील ~~सामान्य~~ मुलाप्रमाणेच वर्णन केले आहे. सम्राट कलीच्या अधिपत्याखाली असणाऱ्या 'कीकतपूर' या राज्यातील इंद्रगड राजधानी असलेल्या शांबला गावातील एक सामान्य मुलगा कल्की त्याच्या सभोवताली घोंगावणारे मृत्यूचे तांडव बघतो. तो विश्वासघात्यांच्या गराड्यात, राजकारणाच्या कट-कारस्थानात आणि त्याला मारण्यासाठी टपलेल्या मोठ्या प्रमाणातील मारेकऱ्यांच्या तावडीत सापडतो. त्याच्यावर जोपर्यंत या परिस्थितीला तोंड देण्याची, दुःखाचा डोंगर सहन करण्याची आणि युद्धाला तोंड देण्याची वेळ येत नाही तोपर्यंत, त्याला त्याच्यात असणाऱ्या वडिलोपार्जित आणि निसर्गदत्त दैवी वारशाची कल्पना नव्हती. कथानकाच्या मध्यापर्यंत म्हणजे जोपर्यंत कथानकातील खलनायक कली दुर्धर आजाराने ग्रासल्यामुळे त्याची बहिण 'दुरुक्ती' त्या आजारावरील संभाव्य औषधाच्या ~~शोधात~~ (सोमरवड्यांच्या) शोधात कथानायक कल्कीच्या गावात येते- हा सोमरवड्यांचा साठा पुरातनकाळी साक्षात देवराज इंद्राने शांबला या गावात लपवून ठेवलेला असतो - आणि सोमरवडे मिळविण्यासाठी शांबला गावावर हल्ला करुन जवळपास निम्म्याहून अधिक ~~गावक~~ गावकऱ्यांची नृशंस हत्या करते, त्यावेळी युवावस्थेत असणाऱ्या कथानायक कल्कीला त्यांच्यामध्ये असणाऱ्या जन्मजात आणि निसर्गदत्त नेतृत्वगुणांचा व असामान्य शक्तीचा प्रथमपरिचय होतो. कथानकाच्या ओघामध्ये त्याला पौराणिक 'सप्तचिरंजीवी' पैकी एक असणारे 'कृपाचार्य' भेटतात आणि त्याच्या या जन्माचे कार्य, आणि तोच विष्णूचा 'दहावा अवतार' असल्याचे विधिलिखित सांगून ~~आ~~ त्या कार्याची सांगता करण्यासाठी त्याला आणखी ज्ञानार्जनाची गरज आहे आणि त्यासाठी त्याला उत्तरेकडे प्रवास करुन, दशअवतारांपैकी ~~सप्तचिरंजीवींपैकी आणखी~~ एक 'सम्राट भार्गव' (भगवान परशुराम) याची भेट घ्यावी लागेल असे सांगतात.

सदर कल्की पुराणाचा गाभाच 'विष्णूने वेळोवेळी अधर्माचा विनाश करुन धर्माची पुनःस्थापना करण्यासाठी घेतलेले अवतार' असा असल्यामुळे कथानकामध्ये प्रभू श्री रामचंद्र, भगवान श्रीकृष्ण, भगवान परशुराम तसेच हिंदू पौराणिक ग्रंथांमध्ये वर्णन केलेल्या 'सप्तचिरंजीवांचा' उल्लेख येणे अपरिहार्यच आहे. पण या अवतारांचे कथानकात उल्लेख करताना आपण आतापर्यंत ऐकलेल्या प्रचलित नावांप्रमाणे नसून लेखकाने भगवान श्रीकृष्णांसाठी 'सम्राट गोविंद', प्रभू रामचंद्रांसाठी 'सम्राट

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

आणि भगवान परशुरामांसाठी 'सम्राट भार्गव' (भृगु ऋषींचा पुत्र) अशा नावांची योजना केली आहे. कथानक जसजसे पुढे सरकत रहाते त्याप्रमाणे 'हनुमान / बजरंगबली' (कथानकातील बाला नावाचा कल्कीचा मित्र जो नेहमी बजरंगबलीप्रमाणे शस्त्र म्हणून गदा बाळगत असतो), कृपाचार्य, बिभिषण. इ. चिरंजीवांचा कथानकात प्रसंगानुरुप प्रवेश होत जातो.

सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे 'धर्मयोध्दा कल्की - विष्णूचा अवतार' हे पुस्तक लेखकाने 'कल्की- अवतार' या विषयावर लिहिलेल्या तीन कथांच्या मालिकेतील प्रथमपुष्प असल्यामुळे या पुस्तकातील प्रकरणांमध्ये विष्णूचे कल्की अवताराच्या आधी झालेले सगळे 'नऊ अवतार' आणि कोणत्यातरी अज्ञात ठिकाणी आपले अस्तित्व राखून असणारे सगळे 'सप्तचिरंजीव' आपल्याला या पुस्तकामध्ये भेटत नाहीत. त्यासाठी वाचकांना 'सत्ययोध्दा कल्की - ब्रम्हाचा डोळा' आणि 'महायोध्दा कल्की - शंकराची तलवार' ही उर्वरीत दोन पुस्तके वाचावी लागतील. हे पुस्तक हा तर कहाणीचा 'पूर्वार्ध' आहे.

या पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणाच्या अगदी शेवटच्या परिच्छेदामध्ये आपल्याला सप्तचिरंजीवांपैकी एक 'अश्वत्थामा' याचा पुसटसा प्रवेश जाणवतो. हो..... जाणवतोच....! कारण लेखकाने अश्वत्थाम्याचा स्पष्ट नामोल्लेख टाळून फक्त त्याच्या कपाळावर असलेल्या जखमेच्या व्रणाचा उल्लेख केला आहे. आपल्याला 'महाभारत' मधून ज्ञात आहेच की महाभारताच्या महायुध्दामध्ये अश्वत्थाम्याने अभिमन्यूपत्नी 'उत्तरा' हिच्या गर्भात वाढणाऱ्या भ्रूणावर ब्रम्हास्त्राचा वापर केल्याच्या प्रमादाची शिक्षा म्हणून भगवान श्रीकृष्णांनी अश्वत्थाम्याला 'अमरत्वाचा शाप' देत त्याच्या कपाळावर जन्मजात असणारा मणी काढून घेतला होता. आणि त्या मणी काढलेल्या कधीही बरा न होणाऱ्या जखमेसह अथवा व्रणासह त्याला अमरत्वाचा अभिशाप भोगायचा आहे. आणि याच व्रणाच्या वर्णनामुळे तो विनासंशय अश्वत्थामाच असावा असा अंदाज आपल्याला येतो.

या पहिल्या पुस्तकाचा उत्तरार्ध संपविल्यानंतर लेखकाने अतिशय चाणाक्षपणे या कथामालिकेतील दुसरे कथानक 'सत्ययोध्दा कल्की - ब्रम्हाचा डोळा' या पुस्तकातील दोन प्रकरणे प्रकाशित करून

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

(37)

वाचकांची या येणाऱ्या पुस्तकांबद्दलची उत्सुकता आणि उत्कंठा जागृत केली आहे. आणि त्यामुळेच हे सुरु केलेले कल्की अवताराचे कथानक पूर्णपणे समजून घेण्यासाठी 'सत्ययोध्दा कल्की - ब्रम्हाचा डोळा' आणि 'महायोध्दा कल्की - शंकराची तलवार' ही दोन पुस्तके वाचावीच लागतील. अपेक्षा आहे की या उर्वरित दोन पुस्तकांमध्ये देखील या पुस्तकाप्रमाणेच लेखकाने कथानकाची ओघवती भाषेत आणि अत्यंत वेगवान पद्धतीने मांडणी करून या पुस्तकाप्रमाणेच वाचकांना खिळवून ठेवले असेलच.

या कथानकाचा उपदेश असा लक्षात येतो की मनुष्यजातीने आपले कर्म आणि वर्तणूक यातील समतोल नेहमी सांभाळला पाहिजे. आणि ज्या ज्या वेळी हा समतोल बिघडेल, त्या वेळी अधर्म अत्युच्च पातळीवर जाईल. आणि या बोकाळलेल्या अधर्म आणि अनाचाराच्या विनाशासाठी सर्वशक्तिमान परमेश्वराला या धरतीवर अवताराद्वारे पुन्हा - पुन्हा जन्म घ्यावा लागेल.

धन्यवाद.